# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः06.06.2025** **वारःगुरुवार**

---

•कर्नाटक, झारखंड, आणि आंध्र प्रदेशातील सात जिल्ह्यांत 6 हजार 400 कोटी रुपयांपेक्षा अधिक किंमतीचे दोन रेल्वे प्रकल्प केंद्राकडून मंजूर

•देशातील सामाजिक सुरक्षा कवच, मागील १० वर्षात, 19 टक्क्यावरुन 64 टक्यांवर. ९४ कोटी नागरिकांना या संरक्षणाचा लाभ

•कच्च्या खाद्यतेलावरील मूलभूत सीमा शुल्क 20 टक्क्यांवरून 10 टक्क्यांवर

•अमेरिका आणि चीन दरम्यान दुर्मिळ खनिजे आणि विद्यार्थ्यांच्या व्हिसांचा समावेश असलेला व्यापार करार

आणि

•मध्य आणि दक्षिण भारतात नैऋत्य मान्सून या आठवड्यात पुनः सक्रिय होण्याची शक्यता तर उत्तर भारतात उष्णतेच्या लाटेचा इशारा

**रेल्वेप्रकल्प**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखालील अर्थसंकल्पीय समितीनं ६ हजार ४०५ कोटी रुपयांच्या दोन रेल्वे प्रकल्पांना मान्यता दिली आहे. या नवीन मार्गामुळे संपर्क, वाणिज्य आणि शाश्वतता यामध्ये सुधारणा होईल असं मोदी यांनी म्हटलं आहे. या मार्गांच्या बांधकामांदरम्यान 108 लाख मानव-दिवसांची थेट रोजगार निर्मिती होण्याची अपेक्षा आहे. या प्रकल्पांमध्ये कोडेरमा - बारकाकाना डबलिंग आणि बल्लारी - चिकजजूर डबलिंग रेल्वे मार्गाचा समावेश आहे. हा प्रकल्प झारखंडच्या एक प्रमुख कोळसा उत्पादन क्षेत्रातून जातो. १३३ किलोमीटर लांब असलेल्या कोडेरमा - बारकाकाना डबलिंग प्रकल्पामुळे ९३८ गावं आणि १५ लाख लोकसंख्या संपर्कात येईल. बल्लारी - चिकजजूर डबलिंग रेल्वे मार्गाची लांबी १८५ किलोमीटर असून, तो मंगळूर बंदराला सिकंदराबादशी जोडेल. हे प्रकल्प तीन वर्षांत पूर्ण केले जातील. झारखंड, कर्नाटक आणि आंध्र प्रदेशातील सात जिल्ह्यांमध्ये असलेल्या या दोन प्रकल्पांमुळे भारतीय रेल्वेच्या विद्यमान क्षेत्रात सुमारे ३१८ किमी वाढ होईल. माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी काल मंत्रिमंडळाच्या बैठकीनंतर नवी दिल्लीत माध्यमांना ही माहिती दिली.

**सामाजिकसुरक्षाकवच**

आंतरराष्ट्रीय श्रमिक संघटनेच्या (ILO) माहितीनुसार, भारतातील सामाजिक सुरक्षा कवचात मागील दहा वर्षात ४५ टक्के वाढ झाली आहे. २०१५ मध्ये 19 टक्के लोक या कवचाचे लाभार्थी होते. २०२५ मध्ये हा टक्का 64 वर गेला आहे. आंतरराष्ट्रीय श्रम संघटनेने भारताच्या या यशाची दखल घेतली असून भारतातील 94 कोटींहून अधिक लोक आता किमान एका सामाजिक संरक्षण कवचाचा भाग असल्याचं नमूद केलं आहे. लाभार्थ्यांच्या संख्येनुसार भारत आता जगात दुसऱ्या क्रमांकावर आहे.

**मोदी**

विविध लोककल्याणकारी योजना जास्तीत जास्त नागरिकांपर्यंत पोहोचाव्यात, यासाठी सरकारच्या वचनबद्धतेचा पुनरुच्चार पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केला आहे. सामाजिक सुरक्षितता क्षेत्रात कामगार मंत्रालयानं राबवलेल्या प्रभावकारी योजनांचा परिणाम म्हणून भारताचं सामाजिक सुरक्षा कवच 64 टक्क्यांपर्यंत पोहोचलं आहे. याबाबत कामगार मंत्री मनसुख मांडवीय यांच्या समाजमाध्यमावरील संदेशावर प्रतिक्रिया व्यक्त करताना मोदी यांनी कामगार मंत्रालयाचं कौतुक केलं आहे.

**खाद्यतेलशुल्क**

केंद्रानं सूर्यफूल, सोयाबीन आणि पाम तेलांसह कच्च्या खाद्यतेलावरील मूलभूत सीमा शुल्कात कपात केली असून हे शुल्क 20 टक्क्यांवरून 10 टक्के केलं आहे. या निर्णयामुळं खाद्यतेलांच्या किंमती कमी होऊन ग्राहकांना दिलासा मिळेल आणि एकंदर महागाई रोखण्यास मदत होईल, असा विश्वास ग्राहक व्यवहार, अन्न आणि सार्वजनिक वितरण मंत्रालयानं व्यक्त केला आहे. शुल्क कमी केल्यामुळे देशांतर्गत तेल शुद्धीकरणाला देखील प्रोत्साहन मिळेल असं मंत्रालयानं म्हटलं आहे.
हे राष्ट्रीय बातमीपत्र आपण आकाशवाणीच्या पुणे केंद्रावरुन ऐकत आहात

**वॉका-11वर्षे-**

**इंट्रो-**

सेवा, सुशासन आणि गरीब कल्याण या तत्त्वांनी प्रेरित होऊन भारतानं गेल्या दशकात उल्लेखनीय परिवर्तन अनुभवलं आहे. आकाशवाणी न्यूज तुमच्यासाठी गेल्या 11 वर्षात प्रमुख क्षेत्रांमध्ये सरकारच्या प्रयत्नांवर एक विशेष लेख सादर करीत आहे. यामध्ये आज भारताच्या वाहतूक पायाभूत सुविधांच्या परिवर्तनावर आधारित हा वृत्तांत माझ्या सहकारी मेघना देशपांडे यांच्याकडून...

**स्क्रीप्ट-**

गेल्या दशकात, भारतामध्ये एकात्मिक दृष्टिकोनातून अभूतपूर्व प्रमाणात पायाभूत सुविधा विकसित झाल्या आहेत.महामार्ग बांधकामाची दैनिक सरासरी, २०१४ च्या तुलनेत जवळजवळ तिप्पट म्हणजे दररोज ३४ किलोमीटर या सर्वोच्च पातळीवर पोहोचली आहे. भारतमाला परियोजनेअंतर्गत, आर्थिक मार्ग विकसित करण्यासाठी आणि जोडसुविधांवरील खर्च कमी करण्यासाठी २० हजार किलोमीटरहून अधिक महामार्ग बांधण्यात आले आहेत. ग्रामीण भागातील संपर्क व्यवस्था ९९ टक्क्यांपर्यंत पोहोचली आहे, २०१४ पासून प्रधानमंत्री ग्राम सडक योजनेअंतर्गत ७ लाख 80 हजार किलोमीटरहून अधिक रस्ते बांधण्यात आले आहेत. पंतप्रधान गतिशक्ती राष्ट्रीय बृहत आराखड्यामध्ये एकात्मिक पायाभूत सुविधा विकासासाठी ४४ मंत्रालयं,

३६ राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांना जीआयएस-आधारित डिजिटल मंचावर एकत्रित केलं आहे. रेल्वेनं मोठ्या प्रमाणात क्षमता वाढ केली आहे, ४५ हजार किलोमीटरहून अधिक मार्गांचं विद्युतीकरण पूर्ण झालं आहे आणि ३३३ जिल्ह्यांना जोडणाऱ्या ६८ वंदे भारत एक्सप्रेस गाड्या धावत आहेत. अमृत भारत स्टेशन योजनेअंतर्गत १३०० हून अधिक रेल्वे स्थानकांचं आधुनिकीकरण केलं जात आहे. विमान वाहतूक क्षेत्रात, उडे देश का आम नागरिक म्हणजे उडान योजनेअंतर्गत ८८ विमानतळ कार्यान्वित करण्यात आले आहेत. मेट्रो रेल्वे आता २३ शहरांमध्ये पसरली आहे, आणि भारत जगातील तिसऱ्या क्रमांकाचं सर्वात मोठं मेट्रो नेटवर्क म्हणून उदयास येत आहे. सागरमाला कार्यक्रमांतर्गत बंदरं आणि देशांतर्गत जलमार्गांनी मोठी झेप घेतली आहे - बंदरांशी जोडलेले २७७ प्रकल्प पूर्ण झाले आहेत. स्टॅच्यू ऑफ युनिटी, जगातील सर्वात उंच चिनाब रेल्वे पूल आणि १० हजार फूट उंचीवरील जगातील सर्वात लांब महामार्ग बोगदा, म्हणजे अटल बोगदा, भारताच्या अभियांत्रिकी चमत्कारांचे उंचच उंच प्रतीक आहेत. एकंदरीत, या प्रगतीद्वारे उत्पादकता वाढत आहे, संपर्क व्यवस्था सुधारत आहे आणि २०४७ पर्यंत विकसित भारतासाठी पाया रचत आहेत.

**<u>जयशंकर</u>**

परराष्ट्र मंत्री एस जयशंकर यांनी २०२५ च्या अखेरीस भारत-युरोपियन संघ मुक्त व्यापार करार शक्य असल्याचं म्हटलं आहे. ब्रसेल्समधील जर्मन मार्शल फंड मंचावर बोलताना, डॉक्टर जयशंकर यांनी सांगितलं की भारत युरोपियन संघासोबत संबंधांना उच्च प्राधान्य देतो, आणि त्याच्या केंद्रस्थानी मुक्त व्यापार कराराच्या वाटाघाटी असून त्यामध्ये चांगली प्रगती होत आहे. भारत आणि चीन दरम्यान सीमा समस्यांव्यतिरिक्त, व्यापार आणि आर्थिक समस्या देखील आहेत असं सांगून डॉक्टर जयशंकर म्हणाले की, दोन्ही देशांमधील संबंधांमध्ये अनिर्णीत सीमा वादाची मोठी भूमिका आहे.

**<u>अमेरिका-चीन</u>**

अमेरिका आणि चीन या दोन देशांदरम्यान या आठवड्यात लंडनमध्ये झालेल्या चर्चेनंतर, अमेरिका आणि चीन यांच्यातील व्यापार करार पूर्ण झाला आहे अशी घोषणा अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी केली आहे. या व्यापार कराराचा भाग म्हणून, चीन अमेरिकेला दुर्मिळ खनिजांचा पुरवठा करेल तर अमेरिका चीनी विद्यार्थ्यांना अमेरिकेचा व्हिसा देईल. एका समाज माध्यमावरील संदेशा द्वारे त्यांनी ही माहिती दिली. चीनचे अध्यक्ष शी जिनपिंग आणि अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्याकडे हा करार अंतिम मंजुरीसाठी प्रलंबित आहे.

**<u>बालमजुरी विरोधी जागतिक दिन</u>**

जागतिक बालमजुरी विरोधी दिवस आज पाळला जात आहे. बालकांचं शोषण या गंभीर समस्येवर प्रकाश टाकून या समस्येच्या निर्मूलनासाठी प्रयत्नांना गती देण्याकरिता या दिवसाचं महत्व आहे. या दिवसाची यावर्षीची मध्यवर्ती संकल्पना "प्रगती स्पष्ट आहे, परंतु अजून बरंच काही करायचं आहे: चला प्रयत्नांना गती देऊया!" अशी आहे. आंतरराष्ट्रीय कामगार संघटना आणि युनिसेफ म्हणजे संयुक्त राष्ट्र बाल निधी यांनी प्रकाशित केलेल्या अहवालानुसार २०२४ मध्ये सुमारे १३८ दशलक्ष बालकामगार होते. यापैकी ५४ दशलक्ष मुलांना धोकादायक कामांवर नेमण्यात आलं होतं.

**क्रिकेट**

आयसीसी विश्व कसोटी अजिंक्यपदाच्या अंतिम सामन्यात लंडनमधील लॉर्ड्सवर काल पहिल्याच दिवशी चौदा गडी बाद झाले.

दिवसअखेर दक्षिण आफ्रिकेच्या ४ बाद ४३ धावा झाल्या. तत्पूर्वी ऑस्ट्रेलियाचा पहिला डाव २१२ धावांत आटोपला. ब्यू वेबस्टरनं सर्वाधिक ७२ धावा केल्या. दक्षिण आफ्रिकेच्या कासिगो राबादानं ऑस्सींचे पाच गडी बाद केले. आकाशवाणीच्या इंद्रप्रस्थ आणि इतर वाहिन्यांवर दुपारी २.५५ पासून या सामन्याचं धावतं समालोचन ऐकता येईल.

**हवामान-**

भारतीय हवामान विभागानं पुढील तीन दिवसांत कर्नाटक, कोकण, गोवा, केरळ, महाराष्ट्र, तामिळनाडू, पुदुच्चेरी आणि कराईकल इथं वीजा आणि वादळासह मुसळधार पावसाचा अंदाज वर्तवला आहे. अंदमान आणि निकोबार बेटं, बिहार, आंध्र प्रदेश, मध्य प्रदेश, तेलंगण आणि उत्तराखंड इथं काही ठिकाणी विजांसह वादळं आणि जोरदार वारे वाहण्याची शक्यता आहे. दुसरीकडे, दिल्ली, चंदीगड, हरियाणा, हिमाचल प्रदेश, जम्मू आणि काश्मीर, मध्य प्रदेश, पंजाब, राजस्थान आणि उत्तर प्रदेशातील काही ठिकाणी उष्णतेच्या लाटेची शक्यता आहे.

## याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं नमस्कार.